शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सातारा
दूरध्वनी ०२१६२- २३४८०७, फॅक्स -०२१६२- २३९४७२. ई-मेल - ssasatara1@rediffmail.com

(25)

# मान्यता/नुतनीकरण २०१९ ते २०२२ मान्यता आदेश

## नमुना दोन

८१८

जा.क्र.:- शिक्षण/प्राथ/प्रशा-१३/RTEमान्यता/PHL /२०१९-२०२०
दिनांक- ०९/११/२०२०

प्रति,
३३ मुख्याध्यापक,
विश्वज्योत इंटरनॅशनल स्कूल फरांदवाडी फलटण ता.फलटण जि.सातारा
युडायस क्रमांक - २७३१०९०४५०४

**विषय- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याच्या नियम ११, पोट-नियम(४)अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

शाळेच्या मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती -**फलटण** कार्यालयाकडे सन २०१९ ते २०२२ पर्यंतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेची तपासणी करून सदर शाळा नियमानुसार आरटीई अॅक्ट २००९ अन्वये भौतिक सुविधा पुर्ण करीत असलेने गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती - **फलटण** यांचेकडील दिनांक- ०५.११.२०२० नुसार आरटीई मान्यतेबाबतच्या शिफारशीसह स्वप्रतिज्ञापत्रास अधीन राहून

मी शिक्षणाधिकारी,(प्राथमिक) जि.प.सातारा. दिनाक- **०१/०४/२०१९** पासून ते दिनांक- **३१/०३/२०२२** पर्यंतच्या कालावधीसाठी इयत्ता- १ ते इयत्ता-**८ वी स्वयंमअर्थसहाय्यित इंग्रजी** माध्यम शाळेकरीता **विश्वज्योत इंटरनॅशनल स्कूल फरांदवाडी फलटण ता.फलटण जि.सातारा** या शाळेस तात्पुरती आरटीई २००९ अंतर्गत मान्यतेस/नुतनीकरणास मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९(जोडपत्र एक)आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११(जोडपत्र दोन)मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
३. शाळा विनाअनुदानित असल्यास नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत,त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित शाळांसाठी परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र्य बँक खाते देईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(२६)

(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये,याची सुनिश्चिती शाळा करील

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा,अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती **फलटण** यांचेकडून स्व-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे

११ मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२ शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडागण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्य किंवा इतर कोणत्याही व्यक्तिच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

**१५.** शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविणेत यावी.

**१६.** तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक – **PHL0904504** असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.

**१७.** शिक्षण संचालक,/जिल्हा शिक्षणाधिकारी, वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

**१८.** संस्थेच्या नोदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

**टिप** - शाळेतील मुख्याध्यापकांनी सन २०१९ ते २०२२ पर्यंतच्या आरटीई मान्यता/नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी/प्रशासनधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी (दुय्यम)नस्ती/फाईल पृष्ठ क्रमांकासह आपल्याकडेच व्यवस्थित जपून ठेवावी.भविष्यात माहिती अधिकारीतील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(प्रभावती कोळेकर)**
**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद सातारा**